


| वर्ष - 9 | अंक -38 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 29 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत

- शीतल, तोमनचे ऐतिहासिक 'सुवर्ण'यश
- सूर्याचं वक्तव्य, प्लेन क्रॅश हातवारे
- तमिळनाडूतील चेंगराचेंगरीत ३६ मृत्यू
- वांगचुक यांच्या पाकिस्तानशी संबंधा

## आता पावसाचं नवं संकट | पुढचे 3 दिवस धोक्याचे, सरकार अलर्ट मोडवर!

# राज्यात पावसाचा हाहाकार!

## मराठवाड्याला झोडपलं, कोकण आणि मुंबईत देखील पावसानं धूमाकूळ घातला

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**महाराष्ट्राला पावसानं झोडपून काढलं आहे, पावसाचा सर्वाधिक तडाखा हा मराठवाड्याला बसला आहे, तर उत्तर महाराष्ट्रात देखील अतिमुसळधार पाऊस सुरू आहे, पश्चिम महाराष्ट्रासह कोकण आणि मुंबईत देखील पावसानं धूमाकूळ घातला आहे. गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यात पावसाची संततधार सुरूच आहे. दरम्यान गेल्या 24 तासांपासून मराठवाड्यात पावसाचा जोर आणखी वाढला आहे. तर दुसरीकडे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रात देखील अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. कोकण आणि मुंबईतही जोरदार पाऊस सुरू असून हवामान विभागाकडून हाय अलर्ट देण्यात आला आहे. जाणून घेऊयात राज्यातील पावसाची स्थिती.**



मराठवाड्यात मुसळधार पाऊस

मोठी बातमी! शिवसेना शिंदे गटाच्या माजी महापौराच्या फॉर्म हाऊसवर सुरू होता भलताच उद्योग, बंगल्यातील

मराठवाड्यात गेल्या 24 तासांपासून पावसाचा जोर वाढला आहे. पावसामुळे जायकवाडी धरणातून सुरू असलेल्या पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे, त्यामुळे गोदावरी नदीला पूर आला असून, नदी काठच्या गावांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नदी काठच्या गावातील लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येत आहे. मराठवाड्यातील जालना, धाराशिव आणि बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक गावाना पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे.

### पश्चिम महाराष्ट्राला पावसाचा तडाखा

पश्चिम महाराष्ट्रात देखील जोरदार पाऊस सुरू आहे. याचा सर्वाधिक फटका हा सोलापूर जिल्ह्याला बसला आहे, सोलापूर जिल्ह्यात पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे. करमाळा तालुक्यातील मांगी तलाव ओव्हर फ्लो झाल्यानं शेकडो एकर जमीन पाण्याखाली गेली आहे. सातारा, सांगली आणि पुण्यामध्ये देखील जोरदार पाऊस सुरू आहे.

दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यालाही पावसानं झोडपून काढलं आहे. जिल्ह्यात ढगफुटी सदृष्य पावसानं हाहाकार उडाला असून, पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. नागरिकांच्या घरात पाणी शिरलं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकसानग्रस्त स्थितीचा आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली आहे. शिर्डीतील साई संस्थानच्या सभागृहात पालकमंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची ही बैठक पार पडली. नाशिकमध्येही पावसाचा जोर वाढला असून, गोदावरी नदीला पूर आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यात अतिमुसळधार पाऊस झाला असून, सावरगाव तेली गावाचा तालुक्याशी संपर्क तुटला आहे. परिसरातील संपूर्ण शेती पाण्याखाली गेली आहे. शेतकऱ्यांचं मोठे नुकसान झालं आहे. सावरगाव तेली गावाच्या चारही बाजूनं पाण्याचा वेढा आहे. एका बाजूंने खडकपूर्णा नदीचा महापूर तर दुसऱ्या बाजूनी इतर नद्यांच्या पाण्याचा वेढा पडला आहे. सावरगाव तेली ते किनगाव जट्टू रस्त्यावरील पूलही पाण्याखाली गेला आहे.

### राज्यावरील संकट कायम

राज्यामध्ये पावसाने हाहाकार माजवलाय. अनेक गावे, शेती पाण्याखाली आहेत. काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पूरस्थिती संदर्भात एक बैठक घेत जिल्हाधिकाऱ्यांना महत्वाच्या सूचना दिल्या. अजूनही धोका टळला नसून आजचा दिवस अलर्ट राहण्याची गरज आहे. नुकताच भारतीय हवामान विभागाने मोठा अंदाज वर्तवला आहे. उत्तर कोकण आणि घाटमाथ्यावर भारतीय हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. मध्य महाराष्ट्रमध्ये आजही विजांच्या कडकडाटासह पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आलाय. कमी दाबाच्या क्षेत्रामुळे सध्या राज्यात जोरदार पाऊस सुरू असून पिके वाहून गेली आहेत. मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, रायगड, पुणे या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला. धुळे, आहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नंदुरबारमध्ये येलो अलर्ट जारी करण्यात आलाय.

## सरकार अलर्ट मोडवर!

राज्यात आगामी काही दिवसांत पावसाचा जोर वाढणार आहे. हवामान विभागानेही एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. हा इशारा लक्षात घेऊन सरकारने 30 सप्टेंबरपर्यंत अलर्ट राहण्याचा आदेश दिला आहे.महाराष्ट्रात पावसाने सध्या धुमाकूळ घातला आहे. मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई, कोकणातही पावसाचा जोर वाढला आहे. मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तर शेतकरी कोलमडून गेला आहे. हातातोंडाशी आलेले पीक अतिवृष्टीच्या पाण्यात वाहून गेले आहे. काही ठिकाणी थेट ढगफुटीसदृश पाऊस झालेला आहे. या संकटातून शेतकरी निघालेला नसताना आता महाराष्ट्राची चिंता वाढवणारा हवामानाचा अंदाज समोर आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढचे 72 तास संपूर्ण महाराष्ट्रासाठी फार महत्त्वाचे असणार आहेत.

नागरिकांच्या तक्रारींवरून कारवाई

आवाजाची पातळी वाढून नागरिकांना त्रास होत असल्याची घटना

# कोथरूडमध्ये दांडिया कार्यक्रम बंद !

## भाजप खासदार मेधा कुलकर्णींचा थेट हस्तक्षेप

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नवरात्र उत्सव सध्या पुण्यात उत्साहाच्या वातावरणात सुरू असून, शहरातील विविध भागात गरबा-दांडिया आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. मात्र, या उत्साहात आवाजाची पातळी वाढून नागरिकांना त्रास होत असल्याच्या घटना देखील समोर येत आहेत. अशीच घटना कोथरूड भागातील जीत मैदान येथे घडली. येथील दांडियाच्या कार्यक्रमामुळे नागरिकांना साऊंडचा प्रचंड त्रास सहन करावा लागला. रहिवाशांच्या तक्रारीनंतर अखेर भाजप नेत्या आणि राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी स्वतः मैदानावर जाऊन कार्यक्रम बंद पाडला.**





### नागरिकांच्या तक्रारीकडे तत्काळ लक्ष

कोथरूड परिसरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात दांडियाचे आयोजन करण्यात येते. यंदाही जीत मैदान येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मात्र, रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या या कार्यक्रमातील डीजे वाजवण्यात येणाऱ्या कर्णकर्कश साऊंडमुळे स्थानिक रहिवासी हैराण झाले. आजारी रुग्ण, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर याचा परिणाम होत असल्याने नागरिकांनी तक्रारींचा पाढा खासदार मेधा कुलकर्णी यांच्यापर्यंत पोहोचवला.

खासदार कुलकर्णी यांनी तत्काळ पोलिस आयुक्त, स्थानिक पोलीस प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कारवाईची मागणी केली. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी स्वतः घटनास्थळी पोहोचून संबंधितांना समज देत हा कार्यक्रम बंद करण्याची कारवाई केली.

### मेधा कुलकर्णींचा थेट हस्तक्षेप

कार्यक्रम बंद करण्याच्या वेळी मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "या मैदानावर दरवर्षी अशाच पद्धतीने कार्यक्रम आयोजित होतो आणि स्थानिक नागरिकांना यातून त्रास सहन करावा लागतो. यंदाही काही गंभीर आजार असलेल्या रुग्णांकडून माझ्याकडे तक्रारी आल्या. आवाजाची मर्यादा ओलांडून, कायद्याचे पालन न करता कार्यक्रम चालू होता. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला. पोलिसांकडे वारंवार तक्रार करूनही काही कारवाई झाली नाही. नाईलाजाने आम्हाला सत्याग्रह करावा लागला. आता अशा प्रकारचे कार्यक्रम कायद्याच्या चौकटीत राहूनच होतील, अन्यथा त्यांना परवानगी दिली जाणार नाही."

### प्रशासनावर प्रश्नचिन्ह

मेधा कुलकर्णी यांनी प्रशासनावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "पोलिस आयुक्त, उपायुक्त आणि स्थानिक पोलीस निरीक्षकांना कळवूनही कारवाई झाली नाही, हे अत्यंत गंभीर आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून जर अशा प्रकारे कार्यक्रमांना मोकळीक दिली जाणार असेल, तर कायद्याचे पालन कसे होणार? प्रशासनाने या संदर्भात कठोर भूमिका घ्यावी आणि आवाजाची मर्यादा ओलांडणाऱ्या आयोजकांविरोधात दंडात्मक कारवाई करावी," अशी मागणी त्यांनी केली.

### नागरिकांचा दिलासा

या घटनेनंतर स्थानिक रहिवाशांनी दिलासा व्यक्त केला. "आम्ही प्रत्येक वर्षी या त्रासाला सामोरे जातो. यावर्षीही प्रचंड आवाजामुळे आमच्या घरी रुग्ण आणि मुलांना खूप त्रास झाला. आम्ही तक्रारी दिल्या तरी त्यावर नेहमीच दुर्लक्ष केले जाते. मात्र यावेळी खासदार मेधा कुलकर्णी यांनी स्वतः पुढाकार घेऊन कार्यक्रम बंद केला. यामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे," अशी प्रतिक्रिया रहिवाशांनी दिली.

### आयोजकांचा बचाव

दुसरीकडे, कार्यक्रम आयोजकांनी मात्र आपली बाजू मांडताना, "आम्ही सर्व परवानग्या घेऊनच कार्यक्रम आयोजित केला होता. नवरात्र उत्सवात नागरिकांचा उत्साह वाढावा या उद्देशाने हा कार्यक्रम झाला. आवाजाची पातळी जास्त असल्याचे कदाचित काहींना वाटले असेल. मात्र आम्ही कायद्याचे उल्लंघन करण्याचा हेतू ठेवला नव्हता," असे सांगितले.

### पुढील कारवाईची अपेक्षा

या संपूर्ण प्रकरणामुळे पुणे शहरातील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत पुन्हा एकदा आवाजाच्या मर्यादेबाबतचा प्रश्न चर्चेत आला आहे. नवरात्र, गणेशोत्सव आणि इतर सणांदरम्यान आवाजाची पातळी ओलांडल्यामुळे नेहमीच नागरिकांकडून तक्रारी येतात. मात्र प्रशासनाची भूमिका मवाळ असल्याची भावना व्यक्त केली जाते. मेधा कुलकर्णी यांच्या हस्तक्षेपामुळे कोथरूडमधील कार्यक्रम तातडीने थांबवला गेला. पण पुढेही अशा प्रकारे कार्यक्रम होऊ नयेत, यासाठी पोलिस व महापालिकेने कठोर पावले उचलण्याची गरज आहे, असे नागरिकांचे मत आहे.

# पुण्यात 'नो मोअर फ्लेक्स, नो मोअर मेस' मोहीम !

## अनधिकृत जाहिरातींवरून जनतेचा संयम सुटला, जाहिरात फलकांवरून महापालिकेला धारेवर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना लावले जाणारे बेकायदा जाहिरात फलक, सणासुदीला वाढत असलेली फ्लेक्सची संख्या, अनधिकृत जाहिरात फलकांबाबत वारंवार तक्रारी करून देखील महापालिकेकडून केले जाणारे दुर्लक्ष या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीवर विमाननगर भागातील नागरिकांचा संयम अखेर सुटला.**




विमाननगर भागातील नागरिकांचा संयम अखेर सुटला. या भागातील रहिवाशांनी एकत्रित येऊन 'नो मोअर फ्लेक्स, नो मोअर मेस!' अशा घोषणा देत नागरिकांनी फ्लेक्स काढण्याची मोहीम राबवली.

या भागातील रहिवाशांनी एकत्रित येऊन स्वयंस्फूर्तीने फ्लेक्स काढण्याची मोहीम राबविली. भरपावसात स्थानिक नागरिकांनी एकत्र जमत या परिसरातील बेकायदा जाहिरात फलक काढून टाकले. केवळ एका तासात या भागातील सुमारे ४० ते ५० फ्लेक्स काढून टाकून फ्लेक्सने भरलेले चौक रिकामे करण्यात आले. 'नो मोअर फ्लेक्स, नो मोअर मेस!' अशा घोषणा देत नागरिकांनी ही मोहीम राबवली. हॅशटॅग प्लेक्स फ्री विमाननगर या हॅशटॅगद्वारे त्यांनी याबाबत जनजागृती सुरू केली आहे. या भागात बेकायदा पद्धतीने लावण्यात आलेल्या जाहिरात फलकांमुळे विमाननगर परिसर बकाल झाला आहे. महापालिकेकडे वारंवार तक्रारी करूनही हे फ्लेक्स काढले जात नाहीत. त्यामुळे हा परिसर मोकळा करण्याच्या उद्देशाने विमाननगरमधील रहिवाशांनी स्वयंस्फूर्तीने फ्लेक्स काढण्याची मोहीम सुरू केल्याची माहिती नागरिकांनी दिली. फ्लेक्स काढताना एक चिंताजनक गोष्ट समोर आली. ती म्हणजे, नवे फ्लेक्स जुन्या फ्लेक्सवरच चिकटवले गेले होते. त्यामुळे फ्लेक्सचे अनेक थर तयार झाले होते.

### फ्लेक्स काढून टाकण्याचे नियोजन

जे काम महापालिकेने करायला पाहिजे ते नागरिकांनी केले आहे. आता तरी महापालिकेने या विषयाकडे गांभीर्याने पाहून उर्वरित बेकायदा जाहिरात फलक तातडीने काढून घ्यावेत अशी, अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. याबाबत महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे म्हणाले, शहरातील ज्या भागात अनधिकृत जाहिरात फलक लावण्यात आलेले आहेत. ते काढून टाकण्याच्या सूचना आकाशचिन्ह विभागातील कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. विशेष मोहीम राबवून फ्लेक्स काढून टाकण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**अनधिकृत बांधकामे** आयुक्त शेखर यांच्या आदेशानुसार आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्फे सखोल पाहणी

# निळ्या पुरेरेषेत 1686 अनधिकृत बांधकामे!

## पवना, मुळा व इंद्रायणी नदीपात्राच्या निळापुर रेषेत येणाऱ्या बांधकामांची यादी महापालिकेकडून सादर

**पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**ˊपिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पवना मुळा आणि इंद्रायणी नदी पात्रात निळा पुरेशी देणाऱ्या अनधिकृत बांधकामांची यादी नुकतीच सादर करण्यात आली असून यानुसार १,६८६ बांधकामे अनधिकृत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून वाहणाऱ्या पवना, मुळा व इंद्रायणी नदीपात्रात अंतर्गत निळ्या पुरेरेषेत येणाऱ्या अनधिकृत बांधकामांची यादी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर यांच्या आदेशानुसार आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्फे सखोल पाहणी करून संबंधित यादी तयार करण्यात आली आहे. या यादीत एकूण १,६८६ अनधिकृत बांधकामे आढळून आली असून त्यामध्ये व्यावसायिक दुकाने, रहिवासी घरे, पत्राशेड, आरसीसी बांधकामे, कच्च्या विटांची घरे तसेच भंगार दुकाने यांचा समावेश आहे. नदीपात्रातील निळ्या पुरेरेषेत येणारी ही बांधकामे पूरप्रवण क्षेत्रात असल्यामुळे येथील अनधिकृत बांधकामांबाबत कोणतेही खरेदी-विक्री व्यवहार अथवा नोंदणी होऊ नये तसेच सामान्य नागरिकांची फसवणूक टाळली जावी यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार बाधित बांधकामांची यादी तयार करून दुय्यम निबंधक, पुणे कार्यालयास सादर करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामार्फत संबंधित अनधिकृत बांधकामांवर नोटीस देण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या नदीपात्रातील निळ्या पुरेरेषेत येणाऱ्या अनधिकृत बांधकामांपासून दूर राहावे, आणि कोणतेही आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी आवश्यक ती शासकीय पडताळणी करावी, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### निळ्या पुरेरेषेमधील अनधिकृत बांधकामांची माहिती

| क्षेत्र | दिलेल्या नोटिसांची संख्या | बाधित भागाची ठिकाणे |
|---|---|---|
| अ | १६८ | भाटनगर, पिंपरी स्टेशन, पिंपरी मेन मार्केट |
| ब | ३१२ | वाल्हेकरवाडी, भोंडवे कॉर्नर,, रावेत, केशवनगर, कासारवाडी |
| क | ३३१ | रिव्हर रेसिडेन्सी, जाधववाडी,मोईफाटा, कुदळवाडी |
| ड | ३९१ | वाकड गावठाण, पिंपळे सौदागर,, रहाटणी, पिंपळे निलख |
| ई | ५९ | मोशी टोलनाका, दाभाडे वस्ती, डूडूळगाव गावठाण |
| फ | ८६ | डिफेन्स कॉलनी, बग वस्ती, पाटीलनगर |
| ग | १७५ | पिंपरीगाव, पिंपरी वाघेरे, सुभाषनगर, संजयगांधी नगर |
| ह | १६४ | सांगवी, दापोडी, कासारवाडी |

एकूण संख्या : १६८६

# स्कूल बसचालकांना आरटीओचा दणका

## धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या 205 बस, व्हॅन, रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड शहरात शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांची वाहतूक करणाऱ्या अनेक बस, व्हॅन आणि रिक्षा धोकादायक पद्धतीने विद्यार्थ्यांना ने-आण करत असल्याचे आढळून आले. यामुळे पालक आणि नागरिकांत प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. अखेर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) वायुवेग पथकाने धडक मोहीम राबवून अशा वाहनांवर मोठी कारवाई केली आहे.**




तपासणी मोहिमेदरम्यान शहरातील तब्बल ३२७ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यात नियमभंग करणाऱ्या २०५ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करत एकूण ७ लाख ६९ हजार ७५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

**सुरक्षिततेला धोका, नियमांचे उल्लंघन**

शहरातील बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थ्यांची ने-आण खासगी बस, इको व्हॅन किंवा ऑटो रिक्षामधून केली जाते. तथापि, काही वाहनचालक अधिक पैसे मिळविण्यासाठी क्षमतेपेक्षा जास्त मुलांना गाडीत कोंबून नेतात. परिणामी विद्यार्थ्यांची प्रवासादरम्यान सुरक्षितता धोक्यात येते. फक्त वाहनाची क्षमता ओलांडून प्रवासी नेण्यापुरतेच उल्लंघन होत नाही, तर अनेक बसकडे योग्य परवाने, फिटनेस प्रमाणपत्रे किंवा विमा नसल्याचेही आढळते. काही वाहनांमध्ये अग्निशमन यंत्रे, प्राथमिक उपचार पेट्या यांसारख्या सुरक्षात्मक सुविधा देखील नव्हत्या. हे प्रकार अपघाताच्या प्रसंगी गंभीर ठरू शकतात.

**नागरिकांच्या तक्रारीनंतर मोहीम**

विद्यार्थ्यांची होणारी धोकादायक वाहतूक लक्षात घेऊन पालक आणि नागरिकांनी पिंपरी-चिंचवड पोलीस तसेच परिवहन विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. काही ठिकाणी मुलांना कोंबून कोंबून व्हॅनमध्ये बसवल्याचे फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवरही व्हायरल झाले होते. यामुळे प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढला. परिणामी, पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली. पिंपरी, भोसरी, चाकण, वाकड, हिंजवडी या वाहतूक विभागांतर्गत ही मोहीम राबविण्यात आली.

**कारवाईचे तपशील**

या कारवाईदरम्यान एकूण ३२७ वाहनांची तपासणी करण्यात आली. यात १७० बसची तपासणी करून ७७ बस नियमभंग करत असल्याचे आढळले. तसेच १५७ व्हॅन आणि रिक्षांपैकी १२८ वाहनांवर नियमभंगाचे प्रकरण नोंदविण्यात आले. या सर्व वाहनांवर मिळून २०५ चालकांविरुद्ध कारवाई झाली आणि त्यांच्याकडून तब्बल ७ लाख ६९ हजार ७५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ही कारवाई केल्यानंतर शहरातील इतर अवैध वाहतुकीवर देखील धाक बसला आहे.

### अपघाताचे सावट टाळता येणार नाही

शहरात विद्यार्थ्यांच्या ने-आणसाठी सुरक्षित, दर्जेदार आणि नियमबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण करणे ही तातडीची गरज आहे. आरटीओच्या कारवाईनंतर इतर चालकांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर शाळा प्रशासनानेही आपल्या शाळेसाठी नेमलेल्या वाहनांची नियमित तपासणी करून जबाबदारी पार पाडावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. सध्या झालेली कारवाई ही केवळ सुरुवात मानली जात असून, यापुढेही आरटीओकडून अशाच प्रकारच्या मोहीमा हाती घेण्यात येणार आहेत. सुरक्षित शालेय वाहतुकीसाठी प्रशासन, शाळा, पालक आणि वाहनचालक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्याशिवाय अपघाताचे सावट टाळता येणार नाही, हे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

**अधिकारी काय म्हणाले?**

**या प्रकरणी आरटीओच्या वायुवेग पथकातील अधिकाऱ्यांनी सांगितले, “विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड सहन केली जाणार नाही. शाळा बस, व्हॅन किंवा रिक्षा चालवताना निर्धारित नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेणे, फिटनेस किंवा विमा नसलेली वाहने वापरणे, साऊंड सिस्टिम लावणे, सीट बेल्ट किंवा इतर सुरक्षेच्या बाबींना हलगर्जीपणा दाखवणे हे गंभीर गुन्हे आहेत. यापुढेही अशा तपासण्या सुरू राहतील आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.”**

**पालक आणि नागरिकांची प्रतिक्रिया**

**या कारवाईनंतर पालकांनी समाधान व्यक्त केले. “आमच्या मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. काही वाहनचालक जास्त पैसे मिळविण्यासाठी मुलांना कोंबून नेतात.**




# हा राजकीय क्षुद्रपणाच

**दिल्ली सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी यांचे सरकारी निवासस्थानातील सामान बाहेर काढून नवीन वादाला निमंत्रण दिले. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सरकारी निवासस्थान रिकामे केल्यावर दोनच दिवसांपूर्वी नव्या मुख्यमंत्री अतिशी यांनी या बंगल्यात आपले सामान हलवले.**

नायब राज्यपालांच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिशी यांचे सामानसुमान बाहेर काढून या शासकीय निवासस्थानाला सील ठोकले. मुख्यमंत्र्यांचे सामान हलविण्यात येत असल्याची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. विशेष म्हणजे अतिशी यांचे सामान बाहेर काढले ते सार्वजनिक बांधकाम विभाग हे खाते मुख्यमंत्र्यांकडेच आहे! केजरीवाल यांनी शासकीय निवासस्थान सोडले असले तरी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तशी नोंद केली नाही. या बंगल्याच्या किल्ल्या केजरीवाल यांनी नवीन मुख्यमंत्री अतिशी यांच्याकडे सुपूर्द केल्या. परिणामी, हे शासकीय निवासस्थान कागदोपत्री अजूनही केजरीवाल यांच्या नावेच आहे. त्याच्या किल्ल्या केजरीवाल यांनी आमच्याकडे परत केल्या नसल्याने कागदोपत्री हे निवासस्थान अजून अतिशी यांना वाटप झालेले



नाही, असा युक्तिवाद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आला. तसेच सिव्हिल लाइन्समधील हे शासकीय निवासस्थान हे मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान नाही, असाही दावा संबंधित प्रशासन आता करते आहे. मुंबईत 'वर्षा' किंवा बंगळूरुमध्ये कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांसाठी 'अनुग्रह' ही केवळ मुख्यमंत्र्यांसाठी राखीव निवासस्थाने आहेत. दिल्ली या केंद्रशासित प्रदेशात मुख्यमंत्र्यांसाठी राखीव निवासस्थानच नाही, असा याचा अर्थ होतो. अरविंद केजरीवाल हे २०१५ पासून या शासकीय निवासस्थानी राहात होते. २०२१ मध्ये या शासकीय निवासस्थानाचे केजरीवाल यांनी नूतनीकरण केले; त्याच्या खर्चावरून भाजपने वाद निर्माण केला. मग सीबीआयने आरोपांची चौकशीही सुरू केली होती. हे निवासस्थान भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याला द्यायचे असल्यानेच मुख्यमंत्र्यांचे सामान हलविल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे.अतिशी यांनी जिथे सामान हलविले ते मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान नाही, हा दावा मान्य केला तरीही कोणाही मुख्यमंत्र्यांना अशा प्रकारे अवमानित करणे कितपत योग्य, हा प्रश्न उरतोच. हा आचरटपणा नायब राज्यपालांच्या आदेशाशिवाय होणार नाही, हेही तेवढेच निश्चित. सध्या बिगर भाजपशासित राज्यांमध्ये लोकनियुक्त सरकार विरुद्ध राज्यपालांमध्ये वाद ही नित्याची बाब झाली आहे. विधानसभेने मंजूर केलेली विधेयके रोखून धरणे, कुलगुरूंच्या नियुक्त्या, सरकारी आदेश अशा विविध मुद्द्यांवर राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री वाद होत असतात. तमिळनाडूच्या राज्यपालांनी तर अभिभाषण वाचण्यास नकार दिला होता. महाराष्ट्रात भगतसिंह कोश्यारी राज्यपालपदी असताना त्यांना न्यायालयाने त्यांना घटनात्मक कर्तव्याची जाणीव करून दिली होती. पण 'काळी टोपी' घालणाऱ्या कोश्यारी यांना कसलेही सोयरसुतक नव्हते. या वादाचा क्षुद्र आविष्कार दिल्लीत दिसला.खासदारांनी पद गेल्यावर एक महिन्यात शासकीय निवासस्थान सोडावे, असा दिल्लीत नियम आहे. जुलै महिन्यात सुमारे २०० माजी खासदारांना निवासस्थाने रिकामी करावीत म्हणून नोटीस बजाविण्यात आली, पण अद्यापही काही माजी खासदार शासकीय निवासस्थानांमध्ये ठाण मांडून आहेत. काँग्रेसचा राजीनामा देऊन भाजपला अनुकूल भूमिका घेणारे गुलामनबी आझाद हे आता कोणत्याही घटनात्मक पदावर नसूनही केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या कृपेने कॅबिनेट मंत्र्यासाठी राखीव असलेले शासकीय निवासस्थान त्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशी आणखीही उदाहरणे आहेत. पण केवळ विरोधी पक्षाच्या मुख्यमंत्री असल्याने अतिशी यांचे सामान त्यांच्या निवासस्थानातून बाहेर काढण्यात आले. सारी प्रक्रिया पूर्ण करून मुख्यमंत्र्यांना निवासस्थानाचे वाटप केले जाईल, अशी सारवासारव आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे.

## संपादकीय »

### अगतिक

***कोणीही विज्ञानदुष्ट व्यक्ती एखादा आश्रम वा आरोग्य केंद्र चालवत असल्यास त्याबाबत कोणाचा आक्षेप असण्याचे कारण नाही.***

आपल्याला ज्याबाबत काडीचाही गंध नाही, त्यावर केवळ सत्तेच्या जोरावर भाष्य करणारे अंतिमत: हास्यास्पद ठरतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे या सत्याचे जागरूक, जितेजागते उदाहरण. नुकताच त्यांनी गर्भवती स्त्रियांनी पॅरासिटॅमोल हे औषध घेतल्यास अपत्य स्वमग्न (ऑटिस्टिक) जन्मते, असा शोध लावून गर्भवती स्त्रियांना हे औषध न घेण्याचा सल्ला दिला. यासाठी कोणीतरी संशोधन केले, नमुना चाचण्या घेतल्या असे काही नाही. ट्रम्प यांना वाटले, त्यांनी ते सांगितले.या गतीने उद्या ते गर्भसंस्काराचा पुरस्कार करण्यासही मागेपुढे पाहणार नाहीत. त्यांचे आरोग्यमंत्री रॉबर्ट एफ. केनेडी (दुसरे) हे अध्यक्षांहून दिव्य. काही राज्यांतून ते बालकांसाठीचे सर्व प्रकारचे लसीकरण बंद करू इच्छितात. करोना काळातही प्रतिबंधात्मक लस टोचून विद्वानअसल्यास त्याबाबत कोणाचा आक्षेप असण्याचे कारण नाही.

लोकांपुढे भाषण करताना नेते मंडळी ८० टक्के समाजकारण अन् २० टक्के राजकारण असा आदर्श उद्घोष करतात.पण प्रत्यक्षात मात्र हे प्रमाण उलटे असते. म्हणजे ही मंडळी ८०- ९० टक्के राजकारण करतात अन् १५-२० टक्के समाजकारण करतात. एकदा आपण यांना निवडून दिले.

# आजच्या राजकारणात आहे फक्त स्वार्थ

राजकारण सुरू होते. तीही जग येते निवडणुकीच्या तोंडावर! निवडणुका जवळ आल्या की आश्वासनांचा, सवलतींचा पाऊस पडतो. सरकारकडे पैसा, तरतूद असो वा नसो, तिजोरी खाली केली जाते. हे फुकट ते फुकट, हे माफ ते माफ अशी आमिषे दिली जातात. खरे तर तरुण पिढी असो की महिला, कुणालाही फुकटचे काही नको आहे. प्रत्येकाला स्वाभिमानाने जगायचे आहे. कष्ट करायचे आहेत. त्यांना त्यांच्या योग्यतेचे काम हवे आहे. रिकामपण आहे म्हणून ही मंडळी बिथरलेली दिसतात. आपण जे मोर्चे, आंदोलन बघतो हे बेरोजगारीतून आलेले नैराश्य आहे. माणसाच्या हाताला काम असेल, कष्टातून त्याला जीवनाच्या मूलभूत गरजा भागवता येत असतील तर तो फुकटचे काही मागणार नाही. पण नेत्यांना हे नको आहे. त्यांना अस्वस्थ, चळवळ्या समाज हवा आहे. रिकामटेकडा युवा वर्ग हवा आहे. त्यांच्या भोवती गर्दी करायला. मोर्चे काढायला. त्याचा जयजयकार करायला. नारे



द्यायला...आजचे राजकारण हे जाती धर्मात वाटलेले, द्वेशाला खतपाणी देणारे, समाज वर्गात दरी निर्माण करणारे गलिच्छ राजकरण आहे. राज्याच्या, देशाच्या प्रगती विषयी कुणाला फारसे देणेघेणे असलेले दिसत नाही. प्रत्येक नेत्याला आपली खळगी भरायची आहे. आपलेच वारस पुढे आणायचे आहेत. समाजाला लुटून बंगले बांधायचे आहेत. आपल्या सात पिढ्यांची सोय करायची आहे. त्यासाठी त्यांना तेव्हढ्यापुरते तुमचे लांगुलचालन करायचे आहे. कुणी म्हणेल, असे कसे म्हणता? गेल्या ६०-७० वर्षात काहीच विकास झाला नाही का? देश प्रगत झाला नाही का? नवे तंत्रज्ञान, सोयी सुविधा मिळाल्या नाहीत का? तर मिळाल्या, प्रगती झाली. प्रत्येक क्षेत्रात विकास झाला. शाळा, कॉलेजेसची संख्या वाढली. इंजिनियरिंग, मेडिकल, आयआयटी, आयएएम अशा संस्थांची संख्या कितीतरी पटीने वाढली. दळणवळणाची साधने तर अमाप झालीत. पण त्यापेक्षा कितीतरी पटीने लोकसंख्या वाढली हे आपण विसरतो. देशाची जमीन, नैसर्गिक संसाधने, तेव्हढीच. नद्या, समुद्र, जंगले तेव्हढीच. पण भूमिती श्रेणीने वाढलेल्या लोकसंख्येमुळे नैसर्गिक असमतोल वाढला, प्रदूषण वाढले, नैसर्गिक प्रकोप वाढले. गांधीजी म्हणायचे आपल्या गरजेपुरते देवाने भरपूर दिलेय आपल्याला. पण आपल्या लोभी, लालची वृत्ती पोटी मात्र निसर्ग हतबल झालाय. या असंतुलनाला देशापेक्षा स्वार्थाला महत्व देणाऱ्या नेते मंडळींनी आधिकच बिघडवले. सध्याची अवतीभवतीची परिस्थिती पाहिली तर काय चित्र दिसते? न्याय, नीतीचे नाव नाही. कुठलीही निष्ठा नाही. प्रामाणिकपणा नाही. पक्षाचे धोरण हा पोरखेळ झालाय.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

अतिवृष्टीचा तडाखा

## १९६ मंडळांत अतिवृष्टी; शहरांतही मुसळधार

# मराठवाड्याला अतिवृष्टीचा तडाखा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाड्यातील तब्बल १९६ मंडळांमध्ये तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ५८ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. पावसाने पुन्हा झोडपल्याने छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातही दाणादाण उडाली असून, अनेक वसाहतींमधील घरांमध्ये पाणी शिरले, तर नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले. लक्ष्मी कॉलनीतील पूल तुटल्याने नागरिकांचा संपर्क तुटला. जिल्ह्यातील ३५४ नागरिकांना सुखरूप बाहेर काढले असून, कन्नड तालुक्यातील ब्राह्मणी नदीत मदन झब्बू राठोड (वय ५५) वाहून गेले असून शोधमोहीम सुरू होती.**

### ५८ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद



शहरात मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांच्यासह अग्निशमन दलाचे जवान, झोन कार्यालयाचे अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही रस्त्यावर उतरून मदतकार्यात सहभागी व्हावे लागले. हर्सूल तलाव ओसंडून वाहू लागला असून खाम आणि सुखना नदीला पूर आला आहे. शहरातील जालाननगर येथील गौरव रेसिडेन्सी, राहुलनगरातील गल्लीनंबर एक, रेवती सोसायटी, सातारा परिसरातील पाडुरंग कॉलनी, विठ्ठल कॉलनी, आनंद कॉलनीसह अनेक वसाहतींना पाण्याचा वेढा पडला. नक्षत्रवाडी आणि जळगाव रोडवरील दोन झाडे पडली. शहरातील पाच मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली.जायकवाडी धरणातून सध्या दोन लाख २६ हजार प्रतिसेकंद घनफूट वेगाने पाणी सोडले असून, त्यामुळे पैठण शहरात पाणी येऊ शकते, असे कळविण्यात आले आहे. पैठण तालुक्यातील नदीकाठच्या १३ गावांतील नागरिकांना हलवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वैजापूर तालुक्यातील दोन गावांत पाणी घुसले. नारायणपूर आणि गोपाळवाडी येथील नागरिकांना व वैजापूर शहरातील २० कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, वैजापूरमधील दोन गावांतील स्थिती लक्षात घेऊन काही कुटुंबांना सुरक्षित स्थळी आणले आहे. प्रशासन सतर्क आहे. कोणीही घाबरू नये, आवश्यकता वाटली की प्रशासनाशी संपर्क साधवा. सोयगाव तालुक्यातील बोरमाळ तांड्यावरील ६ शेळ्या पुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. खुलताबादमधील बाजारसावंगी येथे ६, काटशिवरी फाटा येथे ३, भिवगावमध्ये २७ व बाबुळगाव येथे १७ नागरिक पुरात अडकले होते.. वैजापूर नगरपरिषद क्षेत्रात २५० नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

### ६८८ नागरिक सुरक्षितस्थळी

कन्नड तालुक्यात अंतापूर येथे ४, देवगाव रंगारी येथे ६ तर गंगापूर तालुक्यात अमळनेर येथील २२ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.लातूर जिल्ह्यातील एकूण ६८८ नागरिक शिरूर अनंतपाळ येथील १२५ तर लातूरजवळील वासनगावमधील रामगिरीनगरातील ४० नागरिकांना व अहमदपूर येथील तीन मजुरांसह ६६ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

# नैसर्गिक आपत्ती बाधितांसाठी कर्जमाफी द्यावी

## पुनरुज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करा : शरद पवार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे अपरिमित नुकसान झाले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था अक्षरश: कोलमडून पडली आहे. शहरी भागांनाही याची झळ पोहोचली आहे. ह्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आपत्ती निवारणाची काही महत्वपूर्ण कामे तातडीने हाती घ्यावीत. नैसर्गिक आपत्ती बाधितांसाठी पुनरुज्जीवर आराखडा तयार करावा अशी महत्वपूर्ण सूचना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारला केली आहे.**



राज्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी एक्स समाजमाध्यमांच्या माध्यमातून सरकारला ही सूचना केली आहे. त्यामध्ये नुकसानीच्या पंचनाम्यासाठी ठरावीक मुदतीचे बंधन नसावे. नुकसान भरपाई सोबत पुनरुज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे.शेतकरी हिताचे निर्णय घेण्याबाबतच्या सूचनांचा समावेश आहे.या अभुतपूर्व आपत्तीमध्ये पंचनामे वेळेत उरकणे अशक्य आहे. पंचनाम्यांच्या आधारे नुकसानीचा अहवाल राज्यशासनास सादर केल्यानंतर नव्याने निदर्शनास आलेल्या नुकसानाची दखल घेतली जात नाही. उदा. अतीवृष्टीनंतर काही दिवसांनी ऊन पडल्यामुळे भिंती-छप्परांना भेगा जाऊन घरे व इतर वास्तू यांची पडझड होते.

पाणी ओसरल्यानंतर पिके व पशूधन व इतर बाबींची हानी निदर्शनास येते. अशा नुकसानीचे देखील पंचनामे होऊन आपदग्रस्तांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी पवार यांनी केली आहे.आपदग्रस्तांना दिली जाणारी मदत ही नुकसान भरपाई नसून अंशत: दिलासा असतो.

शेतकरी व सामान्य जनता आपत्तीने कोलमडून गेली असल्याने ह्या नुकसान भरपाई सोबतच पुनरूज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात यावा. ह्यात पिकांच्या पुनर्पेरणी व पुनर्लागवडीसाठी विशेष मदत , फळबागांच्या पुनरूज्जीवनासाठी विशेष मदत यांचा समावेश असावा. वाहून गेलेली किंवा नापीक झालेली जमीन सुधारण्यासाठी विशेष आराखडा तयार करावा. लहान-मोठे बंधारे, सिंचन कालवे, विहिरी, पंपिंग यंत्रणा व इतर सिंचन साधनांची दुरुस्ती व गाळ काढण्याची तसेच शेतकऱ्यांच्या बांध-बंदिस्तीची कामे हाती घ्यावीत. पुनर्बांधणी व पुनरूज्जीवनाची कामे मनरेगा कामांतून कशी होतील, आपदग्रस्तांच्या हातांना काम कसे मिळेल याचे देखील नियोजन करावेतयार करावा. पाऊस कमी झाल्यावर व पूर ओसरल्यानंतर ह्या आराखडयाची अंमलबजावणी तातडीने कशी होईल याकडे लक्ष देण्याची सुचनाही पवार यांनी सरकारला केली आहे.

### संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी

अतीवृष्टी आणि पूराने नागरीकांचे संसारपयोगी साहित्य (भांडी, कपडालत्ता, फर्निचर वगैरे) नष्ट झाले आहे. शालेय साहित्य, चारा व शेतीची साधने, व्यवसायिक साहित्य यांची नासधूस झाली आहे. ह्या जंगम वस्तूंचा देखील पुरवठा करण्याचे नियोजन करावे व त्या वेळेत पुरवण्यात याव्यात. पीक विमा योजनेतील पात्रतेचे निकष शिथील करावेत, जेणेकरून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना विमा लाभ मिळेल. खाजगी विमा कंपन्यांकडून टाळाटाळ व दिरंगाई होणार नाही, याकडे सरकारने लक्ष द्यावे. वित्तीय संस्थांकडून कर्जदार शेतकरी व व्यवसायिक यांच्याकडून होणारी वसूली तात्काळ स्थगित करावी आणि शेतकरी व व्यवसायिक यांना दिलासा देण्यासाठी संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी अशी मागणीही पवार यांनी केली आहे.

## पाकिस्तानवर दणदणीत विजय

## पाकिस्तानला पराभवाची धूळ चारताच मोदींची पोस्ट

# ‘खेळाच्या मैदानावरही ऑपरेशन सिंदूर’

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने अंतिम सामन्यात पाकिस्तानवर ५ विकेट्सने दणदणीत विजय मिळवत ९ व्यांदा आशिया चषक जिंकला आहे. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संघाचे आगळेवेगळे अभिनंदन केले आहे. ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला जोरदार टोला लगावला आहे.**

भारतीय क्रिकेट संघाने आशिया चषकात सलग तिसऱ्यांदा पाकिस्तानवर विजय मिळवत एक नवा विक्रम प्रस्थापित केला. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर पोस्ट केली. “ऑपरेशन सिंदूर असो किंवा खेळाचे मैदान निकाल एकच.... तो म्हणजे भारताचा विजय”, असा टोला लगावत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन व्यक्त केले.आशिया चषकातील भारत-पाकिस्तान सामन्यावरून भारतात मोठा गजहब उडाला होता. पहलगामचा हल्ला, ऑपरेशन सिंदूर या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबर खेळणे योग्य नाही, अशी टीका विरोधकांकडून करण्यात आली. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह असल्यामुळे भाजपाला लक्ष्य करण्यात आले. सुरुवातीला एकदाच म्हणजे १४ सप्टेंबर रोजी भारत-पाकिस्तान सामना होणार होता. मात्र २१ सप्टेंबर रोजी सुपर ४ मध्ये पाकिस्तानशी पुन्हा एकदा भारताचा सामना झाला. या सामन्यातही भारताने पाकिस्तानला पराभवाची धुळ चारली होती.मात्र या दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हरीस रौफने विमान पाडले असल्याचे जे हातवारे केले, त्यावरून भारतात नाराजी पसरली होती. पहिल्या सामन्यात भारतीय संघाने हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतल्याचे दुसऱ्या सामन्यावर पडसाद उमटले होते. या सर्वांचा परिणाम म्हणून भारत-पाकिस्तानचा अंतिम सामना अतिमहत्त्वाचा बनला होता.पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत असताना भारतीय संघाला विजयासाठी १४७ धावांचे आव्हान दिले होते.

पाकिस्तानच्या सलामीच्या फलंदाजांनी चांगली सुरुवात केली होती.

मात्र १० व्या षटकानंतर पत्त्यांच्या घराप्रमाणे पाकिस्तानचा डाव कोसळला. १४७ धावांचा पाठलाग करत असताना भारताने पॉवरप्लेमध्ये ३ मोठ्या विकेट्स गमावल्या. अभिषेक शर्मा ५ धावा करत, शुबमन गिल १२ धावा तर सूर्यकुमार यादव १ धावा करत बाद झाले.यानंतर तिलक वर्माने संजू सॅमसनच्या साथीने भारताचा डाव सावरला. संजू सॅमसन २४ धावा करत बाद झाला. मात्र तिलकने यानंतर शिवम दुबेसह अर्धशतकी भागीदारी केली. तर शिवम दुबेने तिलक वर्माला चांगली साथ दिली आहे. तिलक-शिवमने ६० धावांची भागीदारी रचली, जी महत्त्वपूर्ण ठरली. शिवम दुबे कमालीचे मोठमोठे फटके खेळले. शिवमने २२ चेंडूत ३३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तिलक वर्मा भारताच्या विजयाचा हिरो ठरला. तिलकने ५३ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ६९ धावांची दिमाखदार खेळी केली.

रिंकू सिंहने अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. भारतीय संघाने आशिया चषक स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा जिंकली.भारतीय क्रिकेट संघाने आशिया चषकात सलग तिसऱ्यांदा पाकिस्तानवर विजय मिळवत एक नवा विक्रम प्रस्थापित केला. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर पोस्ट केली. “ऑपरेशन सिंदूर असो किंवा खेळाचे मैदान निकाल एकच.... तो म्हणजे भारताचा विजय”, असा टोला लगावत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन व्यक्त केले.आशिया चषकातील भारत-पाकिस्तान सामन्यावरून भारतात मोठा गजहब उडाला होता. पहलगामचा हल्ला, खेळणे योग्य नाही, अशी टीका विरोधकांकडून करण्यात आली. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह असल्यामुळे भाजपाला लक्ष्य करण्यात आले. सुरुवातीला एकदाच म्हणजे १४ सप्टेंबर रोजी भारत-पाकिस्तान सामना होणार होता.

### हरीस रौफने विमान पाडले

मात्र २१ सप्टेंबर रोजी सुपर ४ मध्ये पाकिस्तानशी पुन्हा एकदा भारताचा सामना झाला. या सामन्यातही भारताने पाकिस्तानला पराभवाची धुळ चारली होती.मात्र या दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हरीस रौफने विमान पाडले असल्याचे जे हातवारे केले, त्यावरून भारतात नाराजी पसरली होती. पहिल्या सामन्यात भारतीय संघाने हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतल्याचे दुसऱ्या सामन्यावर पडसाद उमटले होते.

# ‘राहुल गांधींच्या छातीत गोळी घालू’

## भाजपा प्रवक्त्याचं खळबळजनक विधान; काँग्रेसचं शाहांना पत्र



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळमधील भाजपाचे प्रवक्त्यांनी लाईव्ह टीव्हीवरील चर्चेदरम्यान काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर काँग्रेसचे खासदार केसी वेणुगोपाल यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून चिंता व्यक्त केली, तसेच सदर प्रवक्त्यावर कारवाई करण्याची मागणी केली. ‘राहुल गांधींच्या छातीत गोळी घालू’, असे विधान केरळ भाजपा नेते, प्रवक्ते पिंटू महादेवन यांनी टीव्हीवरील चर्चेत म्हटले.**

केसी वेणुगोपाल यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले, राजकीय क्षेत्रातील मतभेद राजकीयदृष्ट्या आणि संवैधानिक चौकटीत सोडवायला हवेत. मात्र भाजपाचे नेते त्यांच्या विरोधकांना लाईव्ह टीव्हीवर जीवे मारण्याची धमकी देत आहेत. निश्चितच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाच्या विचारसरणीविरुद्ध राहुल गांधींच्या लढाईने त्यांना अस्वस्थ केलेले आहे.केसी वेणुगोपाल यांनी या पत्रात राहुल गांधींना सोशल मीडियावर वारंवार देण्यात येणाऱ्या धमक्यांकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. यापैकी काही भाजपाशी संबंधित लोक आहेत. त्यांनी इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या हत्यांचा उल्लेख केलेला असल्याचे वेणुगोपाल यांनी म्हटले.थंडपणे आणि नियोजनबद्धपणे ही धमकी दिली असल्याच आरोप करत काँग्रेसने भाजपा प्रवक्त्यावर कारवाईची मागणी केली. वेणुगोपाल यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले की, महादेवन यांनी केलेले विधान हे जीभ घसरण्याचा किंवा अतिरंजित विधानाचा प्रकार नाही. ही थंडपणे आणि नियोजन पद्धतीने दिलेली धमकी आहे.

### थेट जीवे मारण्याची धमकी

भारतातील एक आघाडीचे राजकीय नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते यांना थेट जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे.महादेवन यांच्या धमकीचा काँग्रेस पक्षाने समाचार घेतला आहे. एका नतद्रष्ट पदाधिकाऱ्याने निष्काळजीपणे आणि जाणुनबुजून जोपासलेल्या द्वेषाच्या विषारी वातारणाचे हे लक्षण असल्याचे काँग्रेसने म्हटले.



# नवरात्रीचा नववा दिवस सिद्धिदात्रीची देवीचा!

महानवमीच्या दिवशी माँ दुर्गेचे नववे रूप माता सिद्धिदात्रीची पूजा केली जाते. नवमी तिथीशी संबंधित खास गोष्टी- माँ दुर्गाला समर्पित नवरात्रीचा पवित्र सण नवमी तिथीपासून संपेल. नवरात्रीच्या नवमीला माँ दुर्गेचे नववे रूप माँ सिद्धिदात्रीची पूजा केली जाते. असे मानले जाते की माता सिद्धिदात्री भक्तांच्या मनोकामना पूर्ण करते आणि भक्तांना कीर्ती, शक्ती आणि धन देखील प्रदान करते. शास्त्रात सिद्धिदात्री आईला सिद्धी आणि मोक्षाची देवी मानण्यात आली आहे. जर आपण माता सिद्धिदात्रीच्या रूपाबद्दल बोललो तर ती माता राणी महालक्ष्मीच्या कमळावर विराजमान आहे. आईला चार हात आहेत. आईने हातात शंख, गदा, कमळाचे फूल आणि चकती घेतली आहे. माता सिद्धिदात्री हे देखील माता सरस्वतीचे रूप मानले जाते. नवमी तिथीला मुलींची पूजा करण्याचीही परंपरा आहे. असे मानले जाते की नवमीच्या दिवशी कन्येची पूजा केल्याने व्यक्तीला शुभ फल प्राप्त होते.

## तिलक वर्मा विजयाचा हिरो

## पाकिस्तानवर तिसऱ्यांदा मिळवला दणदणीत विजय

# भारत आशिया चषक चॅम्पियन!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने अंतिम सामन्यात पाकिस्तानवर ५ विकेट्सने दणदणीत विजय मिळवत आशिया चषक आपल्या नावे केला आहे. तिलक वर्मा भारताच्या विजयाचा हिरो ठरला. रिंकू सिंहने अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत भारताचा विजय पक्का केला. विजयासह सर्वात मोठी गोष्ट म्हणजे सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने आशिया चषक स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा जिंकली आहे.**

## सुवर्ण जिंकणारी पहिली तिरंदाज



भारताला अखेरच्या षटकात ६ चेंडूत १० धावांची गरज होती. १९व्या षटकात फहीम अश्रफने अखेरच्या चेंडूवर शिवम दुबेला झेलबाद केलं. यानंतर अखेरच्या षटकासाठी रिंकू सिंग फलंदाजीला आला. पहिल्या चेंडूवर तिलक-रिंकूने २ धावा केल्या. तिलकने दुसऱ्या चेंडूवर षटकार लगावला आणि इथेच भारताचा विजय पक्का झाला. त्यानंतर संपूर्ण स्पर्धा न खेळलेल्या रिंकू सिंहने फक्त १ चेंडू खेळत विजयी चौकार लगावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने आशिया चषकात पाकिस्तानचा ३ वेळा पराभव करत हॅटट्रिक नोंदवली आहे.पाकिस्तानने दिलेल्या १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरूवात प्रचंड वाईट झाली. भारताने पॉवरप्लेमध्ये ३ मोठ्या विकेट्स गमावल्या. अभिषेक ५ धावा करत, गिल १२ धावा तर सूर्यकुमार यादव १ धावा करत बाद झाले. यानंतर तिलक वर्माने संजू सॅमसनच्या साथीने भारताचा डाव सावरला. तिलक वर्माने अर्धशतक करत मैदानावर पाय घट्ट रोवून उभा राहिला. संजू २४ धावा करत बाद झाला. तिलकने यानंतर शिवम दुबेसह अर्धशतकी भागीदारी केली. तर शिवम दुबेने तिलक वर्माला चांगली साथ दिली आहे. तिलक-शिवमने ६० धावांची भागीदारी रचली, जी महत्त्वपूर्ण ठरली. शिवम दुबे कमालीचे मोठमोठे फठके खेळले. तिलक वर्मा भारतासाठी या सामन्यात तारणहार ठरला.पाकिस्तानकडून फहीम अश्रफने उत्कृष्ट गोलंदाजी करत तीन विकेट्स घेतले. तर अबरार अहमद आणि शाहीन आफ्रिदीने १-१ विकेट घेतली. भारताने नाणेफेक जिंकत पाकिस्तानला फलंदाजीसाठी पाचारण केलं.

पाकिस्तानची सुरूवात चांगली झाली आणि संघाच्या सलामीवीरांनी ८४ धावांची भागीदारी रचत एकही विकेट गमावली नाही. पॉवरप्लेमध्ये पाकिस्तानने ५६ धावा केल्या. यासह फरहानने पुन्हा भारताविरूद्ध अर्धशतक झळकावलं. तर फखर जमाननेही ४६ धावांची खेळी केली. पण वरूण चक्रवर्तीने भारताला ब्रेकथ्रू मिळवून दिला आणि टीम इंडियाचं सामन्यात पुनरागमन झालं. पाकिस्तानचे सलामीवीर वगळता इतर सर्व फलंदाज फेल ठरले. पाकिस्तानच्या ३ फलंदाजांनी तर खातंही उघडलं नाही. कुलदीप यादवने पुन्हा एकदा भारतासाठी उत्कृष्ट गोलंदाजी करत ४ विकेट्स घेतले. कुलदीपविरूद्ध फलंदाजांनी सुरूवातीच्या षटकांमध्ये फटकेबाजी केली. पण नंतर त्याने एका षटकात ३ विकेट्स घेत पाकिस्तानच्या फलंदाजीला सुरूंग लावला. याशिवाय बुमराह, अक्षर पटेल आणि वरूण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. यासह पाकिस्तानचा संघ १४६ धावांवर सर्वबाद झाला. भारताला अखेरच्या षटकात ६ चेंडूत १० धावांची गरज होती. १९व्या षटकात फहीम अश्रफने अखेरच्या चेंडूवर शिवम दुबेला झेलबाद केलं. यानंतर अखेरच्या षटकासाठी रिंकू सिंग फलंदाजीला आला. पहिल्या चेंडूवर तिलक-रिंकूने २ धावा केल्या. तिलकने दुसऱ्या चेंडूवर षटकार लगावला आणि इथेच भारताचा विजय पक्का झाला. त्यानंतर संपूर्ण स्पर्धा न खेळलेल्या रिंकू सिंहने फक्त १ चेंडू खेळत विजयी चौकार लगावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने पाकिस्तानने दिलेल्या १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरूवात प्रचंड वाईट झाली.

### दुबेने वर्माला साथ दिली

अभिषेक ५ धावा करत, गिल १२ धावा तर सूर्यकुमार यादव १ धावा करत बाद झाले. यानंतर तिलक वर्माने संजू सॅमसनच्या साथीने भारताचा डाव सावरला. तिलक वर्माने अर्धशतक करत मैदानावर पाय घट्ट रोवून उभा राहिला. संजू २४ धावा करत बाद झाला. तिलकने यानंतर शिवम दुबेसह अर्धशतकी भागीदारी केली. तर शिवम दुबेने तिलक वर्माला चांगली साथ दिली आहे.

## भारतीय संघाचा ट्रॉफी स्वीकारण्यास नकार

## पाकिस्तानला पराभूत करत आशिया चषक आपल्या नावे

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने आशिया चषक २०२५ च्या अंतिम सामन्यात पाकिस्तानचा ५ विकेट्सने दणदणीत पराभव केला. पण विजेत्या भारतीय संघाने मात्र आशिया चषकाची ट्रॉफी आज म्हणजेच विजयाच्या दिवशी घेण्यास मात्र नकार दिला आहे. भारतीय संघाने आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे चेअरमन मोहसीन नक्वी यांच्या हस्ते जेतेपद स्वीकारण्यास नकार दिला.**



भारताला आशिया कपची ट्रॉफी उचलण्यासाठी जवळपास तासभर प्रतीक्षा करावी लागली कारण पारितोषिक वितरण समारंभ उशिरा सुरू झाला. सामना संपल्यानंतर पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, भारतीय संघाने आशियाई क्रिकेट परिषद (ACC) चे अध्यक्ष आणि पाकिस्तानचे मंत्री मोहसिन नकवी यांच्याकडून विजेत्यांची ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला होता. अखेरीस टीम इंडियाने ट्रॉफी समारंभातून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. यासह भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवची विजयानंतर मुलाखतही घेतली गेली नाही. एसीसीने मला कळवले आहे की भारतीय संघ आज रात्री आपली पारितोषिकं स्वीकारणार नाही. त्यामुळे हा पारितोषिक समारंभ इथेच संपतो," असे सूत्रसंचालक सायमन डुल म्हणाले. फक्त अभिषेक शर्मा, तिलक वर्मा आणि कुलदीप यादव यांनी आपापली वैयक्तिक पारितोषिकं घेतली, पण भारतीय संघाने एकत्रितपणे ट्रॉफी घेण्यासाठी किंवा फोटो काढण्यासाठी व्यासपीठावर पाऊल ठेवले नाही.सामना संपून जवळपास तासभर झाल्यानंतरही पाकिस्तानी खेळाडू ड्रेसिंग रूममधून बाहेर आले नव्हते.

### आशिया चषकाची ट्रॉफी पटकावली

मोहसीन नक्वी यांना परिषदेच्या प्रोटोकॉलनुसार पारितोषिक वितरण करायचे होते, पण ते एकटेच व्यासपीठावर उभे होते. भारताने पाकिस्तानवर ५ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला आणि स्पर्धेतील आपलं नववं विजेतेपद पटकावलं. अंतिम सामन्यापूर्वीच चर्चा रंगल्या होत्या की, जर भारताने आशिया चषकाची ट्रॉफी पटकावली

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। सोमवार।

। दि. 29 सप्टेंबर 2025।

### समाजातील वास्तविक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय सूचविण्याचे सादरीकरण

# हॅकेथॉनमधून विद्यार्थ्यांच्या नव संकल्पना व्यासपीठ!

## डॉ. पंडित विद्यासागर : पीसीयू मध्ये हॅकेथॉन स्पर्धा संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हॅकेथॉन सारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना समाजातील वास्तविक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय सुचविणे आणि त्यांचे प्रभावी सादरीकरण करण्याची संधी मिळत असते. पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे स्मार्ट इंडिया इंटरनल हॅकेथॉन सारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नव संकल्पना कौतुकास्पद आहेत. हे विद्यार्थी समाजातील गंभीर आव्हानांना उत्तर देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधतील आणि भारताच्या प्रगतीत योगदान देतील,असे गौरवोद्गार नियामक मंडळ सदस्य डॉ. पंडित विद्यासागर यांनी काढले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या साते वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे "स्मार्ट इंडिया इंटरनल हॅकेथॉन २०२५" स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल च्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमधील नाविन्य व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्याच्या राष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये १०१ संघांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ६७ संघांची इंटरनल प्रेझेंटेशन फेरीसाठी निवड झाली. काटेकोर मूल्यमापनानंतर ४५ संघांची अंतिम निवड करण्यात आली तर ५ संघ प्रतीक्षा यादीत ठेवण्यात आले.

उद्योग - शैक्षणिक संबंध संस्था संचालक डॉ. प्रणव चरखा, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील आणि डॉ. सागर पांडे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी पीसीईटी चे कार्यकारी संचालक, पीसीयू चे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्रभारी उप कुलगुरू डॉ. संदीप थेपडे व विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

डॉ. अनिकेत कुलकर्णी, अमेय तांबे (टेक्नो सॅम, पुणे), डॉ. सागर शिंदे, डॉ. उमा पाटील आणि डॉ. संजीवकुमार अंगडी (नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी) यांनी परीक्षक म्हणून काम केले. अंकुश दहात यांनी समन्वयक जबाबदारी पार पाडली.

इनसाईट हब क्लब सदस्य, विद्यार्थी स्वयंसेवक, प्रशासनिक कर्मचारी तसेच मार्केटिंग व डिझाईन टीम यांनी आयोजनात सहभाग घेतला.

पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

---

# पिंपरी चिंचवड महापालिका ठरली मार्गदर्शक!

## “स्वच्छ शहर जोडी” उपक्रमात पाच नगरपरिषदांसोबत सामंजस्य करार

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड|प्रतिनिधी: गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या “स्वच्छ शहर जोडी ” उपक्रमात पिंपरी चिंचवड महापालिकेची देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मार्गदर्शक शहरांमध्ये निवड झाली आहे. या उपक्रमाअंतर्गत महापालिकेला पाच लहान नगरपरिषदांना स्वच्छता क्षेत्रात मार्गदर्शन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.**



महापालिकेच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या सुरगाणा (नाशिक), लांखादूर (भंडारा), मंचर (पुणे), जामखेड (अहिल्यानगर), आळंदी (पुणे) या पाच नगरपालिकांबरोबर सामंजस्य कराराचा कार्यक्रम पिंपरी येथील ऑटो क्लस्टरमध्ये पार पडला. केंद्रीय मंत्री मोहनलाल खट्टर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिकेच्या वतीने करार केला.

कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य विभाग प्रमुख सचिन पवार यांच्यासह संबंधित नगरपरिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह यांनी सर्व नगरपरिषदांच्या घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छता कार्यपद्धतींचा आढावा घेतला. ते म्हणाले, “महापालिका आपल्या अनुभव, तंत्रज्ञान व व्यवस्थापन कौशल्याच्या माध्यमातून या नगरपरिषदांना सर्वतोपरी सहकार्य करणार आहे.” आरोग्य विभाग प्रमुख सचिन पवार यांनीही महापालिकेचे यशस्वी प्रकल्प कचरा विलगीकरण, संकलन व प्रक्रिया प्रणाली याबाबत माहिती दिली. “या नगरपरिषदांच्या कामगिरीत सातत्याने सुधारणा व्हावी यासाठी आवश्यक त्या सुविधा व मार्गदर्शन दिले जाईल,” असे त्यांनी सांगितले.

स्वच्छ भारत मोहिमेच्या पुढील टप्प्यात पिंपरी चिंचवड महापालिका केवळ स्वतःपुरती मर्यादित न राहता इतर शहरांना सक्षम करण्याचा पुढाकार घेत आहे. त्यामुळे स्वच्छतेच्या दिशेने देशभरात एकात्मिक व सामूहिक प्रगती साधली जाणार आहे.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046